I.O करीता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): अहमदनगर **P.S.**(ठाणे): एम.आय.डी.सी

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0937 **Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 11/10/2023 14:10

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार
**Time Period** (कालावधी): पहर 1
**Date From** (दिनांक पासून): 26/07/2023
**Date To** ( दिनांक पर्यंत): 26/07/2023
**Time From** (वेळेपासून): 00:00 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 00:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 11/10/2023 **Time** (वेळ): 13:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 027
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 11/10/2023 13:47 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 5 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): एमआयडीसी पोलीस स्टेशन ,फार्मा चैक, रेणुका माता,मंदिराचे जवळील आय टी पार्क येथ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): उमेश दगडू शेळके

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वडगाव गुप्ता ,एम.आय.डी.सी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वडगाव गुप्ता ,एम.आय.डी.सी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नंदलाल मुरलीधर खैरे | | | 1. MIDC ,एम.आय.डी.सी, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद अहमदनगर
दि.11/10/2023

मी उमेश दगडू शेळके, वय-31 वर्ष, धंदा-शेती, रा.वडगांव गुप्ता, ता.नगर, जि.अहमदनगर मो.नं.9420829335 समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर राहण्यास असुन शेती व्यवसाय करुन कुटुंबाची उपजीविका भागवतो. मी दि.26/07/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे संपर्क करुन माझी एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे फोनव्दारे कळविले होते. त्याप्रमाणे ला.प्र.वि अ.नगर येथील पोलीस निरीक्षक श्री आल्हाट यांनी मला लाच रक्कम व वाहनांसह वडगाव गुप्ता ता.नगर येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगीतले होते. त्याप्रमाणे मी वडगाव गुप्ता येथील सुरक्षित ठिकाणी हजर असताना दुपारी 01/30 वा चे सुमारास पोनि आल्हाट हे सापळा पथकासह चारचाकी वाहनाने तेथे आले. त्यांनी त्यांची स्वतःची, पंचांची, स्टाफची व माझी आपसात ओळख करुन दिली. त्यानंतर मी पोनि आल्हाट यांना पंचासमक्ष एमआयडीसी पोलीस स्टेशन चे खैरे पोलीस यांनी माझ्यावर व माझ्या भावावर विनयभंगाचा गुन्हा दाखल न करण्यासाठी माझ्याकडे 30,000/- रु. लाच मागणी करीत असलेबाबत सविस्तर तक्रार दिली होती.

त्यानुसार खैरे पोलीस यांचे विरूध्द लाच मागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि आल्हाट यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकार्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याचे वापराबाबत माहिती सांगितली. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी लाच मागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी दुपारी सव्वादोन वा.चे सुमारास माझ्याकडे व्हाईस रेकार्डर चालु करून देवुन मला व पंच नं.1 यांना खैरे पोलीस यांची भेट घेण्यासाठी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे माझेकडील दुचाकी वाहनावरुन रवाना केले. त्याप्रमाणे मी पंच नं.1 यांचेसह एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे जावून खैरे, पोलीस यांची भेट घेतली. त्यावेळी खैरे, पोलीस यांनी पंच नं.1 यांचे समक्ष माझे भावजयीने दाखल केलेल्या गुन्हयातील मुद्येमालाचे व पंचांच्या सहया बाबत चर्चा केली. सदर चर्चे दरम्यान खैरे पोलीस यांनी माझ्याकडे त्यांची स्वाक्षरी व शिक्का असलेले पंचांच्या सहयाचे लेबल दिले. त्यानंतर त्यांनी त्यांचेकडील मोबाइल फोनचे स्क्रिनवर 50,000 असे टाईप केले व मी तुला बोललो होतो त्या दिवशी असं, असे म्हणाले असता मी खैरे पोलीस यांना हे लई होतेत, असे म्हणालो. त्यावर खैरे पोलीस म्हणाले, ऐक ना, तुला मी काय सांगतो असे म्हणुन मोबाइल स्क्रिनवर 30,000 असे टाईप केले, त्यावेळी मी त्यांना अहो लई होतेत तेवढे असे म्हणालो. त्यावर खैरे पोलीस म्हणाले, हे किती हेत ? व हाताने इशारा करुन हे पहा तू असं केलय त्या दिवशी, ते मी नको म्हणालो होतो मग तू गेला मागं, त्यांनी 30,000 रुपये स्क्रिनवर टाईप करुन दाखविल्यानंतर मी म्हणालो आता दहाच हजार आहे माझ्याकडे, मग काय करु? असे विचारले असता खैरे पोलीस म्हणाले, आता करुन टाक असन तर, असे म्हणुन त्यांनी माझ्याकडे 10,000/- रु. लाच मागणी केली. त्यावेळी मी यांना पैसे घरी असल्याचे सांगून ते घेवुन येतो असे म्हणालो असता खैरे पोलीस म्हणाले, जावुन ये असे म्हणुन त्यांनी 10,000 /- रु. लाच मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी व पंच नं.1 असे तिथुन निघुन पोनि आल्हाट हे सापळा पथकासह थांबले त्या सुरक्षित ठिकाणी परत आलो. तेथे पोनि आल्हाट यांनी माझेकडील व्हाईस रेकार्डर ताब्यात घेवुन बंद केला आणि पंच नं.1 व मला खैरे पोलीस यांची एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यन्तच्या हकीकतीबाबत विचारता आम्ही वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकार्डरमधील ध्वनीमुद्रित संभाषणाची फाईल ऐकुन पाहिली. लाच मागणी व कामाच्या चर्चे बाबत अधिक स्पष्टता येणेकरीता मला पंचासह पुन्हा खैरे पोलीस यांची भेट घेण्यासाठी पाठविण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगून, व्हाईस रेकार्डर चालु करुन तो माझे ताब्यात देवुन, मला पंच नं.1 यांचेसह खैरे पोलीस यांची भेट घेण्यासाठी माझेकडील दुचाकीवरुन रवाना केले.

मी व पंच नं.1 असे एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे जावुन पोलीस स्टेशनच्या बाहेरुनच मी मोबाइल वरुन खैरे पोलीस यांना फोन लावला व फोनचा स्पिकर चालू करुन बोलणे केले त्यावेळी खैरे पोलीस हे जेवायला आलतो, थोडया वेळाने मी जिमखान्याकडं येतो, तिकडं ये असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे तिथुन निघुन जिमखान्याचे जवळ जावुन बराच वेळ थांबलो. तेथून मी पुन्हा खैरे पोलीस यांना फोन करुन स्पिकर चालू करुन बोलणे केले व जिमखान्यापाषी आहे असे म्हणता खैरे पोलीस हे आलोय आय टी पार्कला ये, असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे आयटी पार्क येथे गेलो. तेथे खैरे पोलीस भेटले त्या ठिकाणी माझेत व खैरे पोलीस यांचेत बराच वेळ माझ्यावर व माझ्या भावावर दाखल होणारे विनयभंगाचे गुन्हयाचे संबंधाने चर्चा झाली. त्या दरम्यान खैरे पोलीस म्हणाले येडा हे का, तुमच्यावर तीनषे चोपन्न होवुन नाही दिला मी माहिती हे का, माझ्या सारखा माणुस नाही भेटणार तुला, दोन दोन गुन्हे दाखल होत होते तुमच्यावर, अजुन काय करायला पाहिजे ? त्यानंतर त्यांनी चहाचे टपरीवरील इसम यांस आवाज देवुन बोलावुन घेतले व दे विषाल कडं, आपलाच माणुस हे, असे म्हणुन माझेकडे पंच न.1 यांचे समक्ष लाचेची मागणी केली. त्यावेळी मी खैरे पोलीस यांना दुर्गेश येतोय पैसे घेवुन असे म्हणालो. त्यानंतर माझेत व खैरे पोलीस यांचेत पुन्हा गुन्हयाचे संबंधाने चर्चा झाली. त्या दरम्यान खैरे पोलीस यांनी हाताचे तीन बोटांनी इशारा करुन तुला तर असे बोललो होतो, पण तु काय असे म्हणतो, त्यानंतर मी म्हणालो तीस हजार ? तीस हजार रुपये कुठ.. लय होतेय, तीस हजार तुम्हाला लगीच दयायला नाई. त्यानंतर खैरे पोलीस व माझेमध्ये अवांतर चर्चा झाली आणि मी त्यांना तुम्ही येथेच थांबा, तुम्हाला फोन लावतो व त्यानंतर तुम्ही त्या कोपÚयाच्या टपरीवर या असे म्हणालो असता ते जावुन ये असे म्हणाले. त्यानंतर मी पंचासह तिथुन निघुन पोनि आल्हाट व सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि आल्हाट यांनी माझेकडील व्हाईस रेका ॅर्डर ताब्यात घेवुन बंद केला आणि पंच नं.1 व मला खैरे पोलीस यांची भेट घेण्यासाठी रवाना केलेपासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेविषयी विचारले असता आम्ही वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेका ॅर्डरमधील माझेत व खैरे पोलीस यांचेत पंचासमक्ष झालेल्या संभाषणाची ध्वनीमुद्रित फाईल व्यवस्थित ऐकली. त्यावरुन पोनि आल्हाट व पंचांची खात्री झाली की, खैरे पोलीस यांनी माझ्यावर व माझ्या भावावर एमआयडीसी पोलीस स्टेषन येथे विनयभंगाचा गुन्हा दाखल करुन न घेतल्याचे मोबदल्यात पंचासमक्ष 30,000/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/- रु. लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याने खैरे पोलीस यांचेविरुध्द सापळा आयोजित करण्याचे ठरले. त्यावर पोनि आल्हाट यांनी मला खैरे पोलीस यांनी मागणी केलेली लाच रक्कम 10,000/- रु. हजर करण्यास सांगितले असता मी माझे बचतीमधील 10,000/- रु. त्यामध्ये 500/- रु. दराच्या 20 चलनी नोटा हजर केल्या. त्या नोटांचे नंबर पोनि आल्हाट यांनी लिहुन घेवुन, पंचांना आणि मला अ ॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे वापराबाबत माहिती सांगून त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकातील कर्मचारी यांना सापळया दरम्यान करावयाच्या सुचना समजावुन सांगून, खैरे पोलीस यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजित इषारा ठरवुन दिला. खैरे पोलीस यांनी पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची रक्कम घेवुन येणेपुर्वी फोन करण्यास सांगितला असल्याने सर्वानुमते खैरे पोलीस यांना फोन का ॅल करुन ते सांगतील त्या ठिकाणी सापळा आयोजित करण्याचे ठरले. त्यावर पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन मी माझे वरील फोन नंबरवरुन खैरे पोलीस यांचे 8888899394 या फोनवर का ॅल केला व स्पिकर चालू करुन बोलणे केले असता, खैरे पोलीस यांनी मला सन फार्मा चैक, रेणुका माता मंदिराचे जवळील आय टी पार्क येथे येण्यास सांगितले. सदरचा का ॅल व्हाईस रेका ॅर्डरच्या साहाय्याने ध्वनीमुद्रित करण्यात आला.

त्यानंतर पोनि आल्हाट, दोन्ही पंच व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने व मी माझेकडील दुचाकी वाहनाने खैरे पोलीस यांनी सांगितलेल्या ठिकाणा पासुन काही अंतरावर सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. तेथे पोनि आल्हाट यांनी व्हा ॅईस रेका ॅर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकले व त्यानंतर पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन मी माझे ेकडील मोबाइल वरुन खैरे पोलीस यांचे वरील मो.नंबर वर फोन केला व फोनचा स्पिकर चालू करुन बोलणे केले, त्यामध्ये मी खैरे पोलीस यांना निघालो होतो मळयातुन असे म्हणालो असता खैरे पोलीस म्हणाले आलोच वीस मिनिटांत असे म्हणाले. त्यानंतर मी म्हणालो उद्या येवु का ? मग त्यावर खैरे पोलीस उद्या कोर्टात जायचे आहे असे म्हणाले. त्यावर मी आता पाऊस चालू हे इकडं, जावु द्या सकाळीच येतो मी असे म्हणालो. त्यावेळी खैरे पोलीस हे ठीक आहे असे म्हणाले. सदरचा का ॅल व्हाईस रेका ॅर्डरच्या साहायाने मेमरीकार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आला. त्यामुळे सदरची कारवाई तुर्तास स्थगित करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यावर पोनि आल्हाट यांनी मला, पंचांना व सापळा पथकातील कर्मचारी यांना झाले कारवाई बाबत गोपनीयता राखणेच्या सुचना देवुन, मला दि.27/07/23 रोजी सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत कळविले.

त्यानंतर 27/07/2023 रोजी मी, पोनि आल्हाट व सापळा पथक असे सुरक्षित ठिकाणी हजर असताना दुपारी

पावणे दोन वा चे सुमारास पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन मी पंचासमक्ष माझेकडील वरील मोबाइल फोन नंबरवरुन खैरे पोलीस यांचे 8888899394 या मोबाइलवर फोन केला व फोनचा स्पिकर चालू करुन बोलणे केले असता खैरे पोलीस म्हणाले, मी कोर्टात आहे आता मी, मला वेळ लागल यायला असे म्हणाले. त्यावर मी त्यांना मला फोन करा आल्यावर असे म्हणालो. त्यानंतर पोनि आल्हाट, पंच, मी व सापळा पथकातील कर्मचारी असे बराच वेळ खैरे पोलीस यांचे फोनची वाट पाहात थांबलो. परंतु खैरे, पोलीस यांचा मला फोन का ॅल न आल्याने सायंकाळी साडेसहा वा चे सुमारास मी पुन्हा पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन खैरे पोलीस यांचे फोनवर का ॅल केला, त्यावेळी खैरे पोलीस यांचा फोन स्विच आ ॅफ असल्याचे समजले. त्यानंतर सर्वानुमते सदरची सापळा कारवाई तुर्तास स्थगित करण्यात आली.
त्यानंतर दि.18/8/2023 रोजी पावेतो खैरे पोलीस यांनी मला फोन केला नाही किंवा कोणत्याही प्रकारे संपर्क केला नाही. त्यामुळे माझ्या लक्षात आले की, खैरे पोलीस यांना माझ्या विषयी काहीतरी संशय आला आहे. त्यामुळे ते माझेकडुन पैसे स्विकारत नाही. त्यामुळे मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात जावुन सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करणेबाबतचा माझा सविस्तर जबाब लिहुन दिला व माझेकडे लाच मागणी पडताळणी वेळी खैरे पोलीस यांनी मला दिलेले त्यांची सही असलेले पंचांच्या सहयांचे लेबल मी पोनि आल्हाट यांचेकडे दिले. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी माझेषी संपर्क करुन दि.26/07/2023 रोजी खैरे पोलीस यांनी माझेकडे लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत वरिष्ठ कार्यालयाची परवानगी प्राप्त झालेबाबत माहिती दिली. तसेच पोनि आल्हाट यांनी खैरे पोलीस यांचे बाबत माहिती घेतली असता त्यांचे नाव नंदलाल मुरलीधर खैरे असून ते पोलीस हवालदार/301 असे असल्याचे समजले आहे. त्यानंतर मी आज रोजी समक्ष हजर होऊन फिर्याद देत आहे. तरी दि.26/7/2023 रोजी मी नोंदविलेल्या लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान एमआयडीसी पोलीस स्टेशन येथील खैरे, पोलीस यांनी माझे व माझ्या भावाविरुध्द एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे संपत भोर यांचे पत्नीची विनयभंगाची केस दाखल करुन न घेतल्याचे मोबदल्यात एमआयडीसी पोलीस स्ट एमआयडीसी पोलीस स्टेशन येथील खैरे, पोलीस यांनी माझे व माझ्या भावाविरुध्द एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे संपत भोर यांचे पत्नीची विनयभंगाची केस दाखल करुन न घेतल्याचे मोबदल्यात एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे व पंचासमक्ष सन फार्मा चैक, रेणुका माता मंदिराचे जवळील आय टी पार्क येथे माझेकडे 30,000/- रु. लाचेची मागणी करुन, तडजोडी अंती 10,000/- रु. लाचेची मागणी केली व सदरची लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविली असल्याने माझी लोकसेवक नंदलाल मुरलीधर खैरे, पोलीस हवालदार/301, एमआयडीसी पोलीस स्टेशन जि.अहमदनगर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
समक्ष

( आर.बी.आल्हाट )
पोलीस निरीक्षक
अ ॅन्टी करप्षन ब्युरो,अहमदनगर

( उमेश दगडु शेळके )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rajendra Ashok Sanap(I (Inspector)) / 15101000402RASM8501Y **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

साबीर मो. अली शेख

**Signature of Officer in-charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajendra Ashok Sar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402RASM850